मिरा भाईंदर महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
प्रसिद्धीपत्रक

- **महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महिला कौशल्यवृद्धी कार्यशाळा!**

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी आणि उद्योजकतेसाठी प्रेरणा देणारी "महिला कौशल्यवृद्धी कार्यशाळा" मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने दि. 19 जून 2025 रोजी महापालिका मुख्यालयात आयोजित करण्यात आले. या कार्यशाळेचे आयोजन नीती आयोग आणि Woman Entrepreneurship Platform (WEP) यांच्या संयुक्त सहकार्याने करण्यात आले.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मा. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व शहर अभियंता श्री. दिपक खांबीत यांच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमाला महिला वर्गाचा उत्स्फूर्द प्रतिसाद लाभला.

महिलांना उद्योजक करताना आर्थिक साक्षरता म्हणजे पैशाचे योग्य व्यवस्थापन करण्याचे ज्ञान आणि कौशल्याचे प्रशिक्षण, व्यवसाय वृद्धीसाठी दिशा आणि आर्थिक साक्षरतेचा लाभ मिळावा या हेतूने WEP, TransUnion CIBIL आणि Micro Save Counselling या संस्थांनी मार्गदर्शन सत्र घेतले. 'फराळ सखी या महापालिकेच्या यशस्वी उपक्रमातील महिलांनीही विशेष सहभाग नोंदवला.

कार्यशाळेत सहभागी महिलांनी व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणी, आर्थिक नियोजन, कर्ज सल्ला अशा विविध विषयांवर प्रश्न उपस्थित केले. नीती आयोग व WEP प्रतिनिधींनी त्यांच्या शंकांचे सविस्तर समाधान करत चर्चासत्र अधिक प्रभावी बनवले.

या उपक्रमानंतर बोलताना आयुक्त मा. राधाबिनोद शर्मा यांनी सांगितले, "महिलांचा आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरण हा राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे. 'फराळ सखी' प्रमाणेच अशा नवकल्पनांनी युक्त उपक्रमांची मालिका भविष्यात राबवली जाणार आहे." तसेच नीती आयोग व WEP चे आभार मानून, उपस्थित महिलांना त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका